



# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

नोव्हेंबर २०२५





श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

विश्वशक्ती केवळ प्रेमस्वरूप असलेल्या दुर्गेच्याच रूपात कार्य करते असे नाही तर, तीच रक्तरंजित विनाशकारी, प्रलयंकारी नृत्य करणारी रौद्ररूपधारिणी काली आहे. भारतीय धर्म असे सांगतो की, ''हे सुद्धा दिव्य मातेचेच एक रूप आहे, ती देखील ईश्वरच आहे आणि तुमच्या अंगी जर धाडस असेल, सामर्थ्य असेल तर तुम्ही तिची उपासना करा.''

– श्रीअरविंद (CWSA 19 : 45)

# महाकाली

संपादकीय....................................................................०२
महाकालीचे स्वरूप.........................................................०३
श्रीमाताजींचे शक्तिकार्य ....................................................१५
महाकालीची कार्यपद्धती..................................................२४
महाकालीचे विविध रूपांमधील दर्शन...................................३३

---

## संपादकीय

ईश्वराचे रूप जसे मधुरमंगल, मनोहर असते तसेच ते उग्र, भीषण, रौद्रदेखील असते. सहसा ईश्वराच्या मधुरमंगल रूपाचीच पूजाअर्चना केली जाते. पण पूर्णयोगाच्या साधकाने मात्र ईश्वराच्या दोन्ही रूपांची उपासना केली पाहिजे. तेव्हाच त्याला ईश्वराची समग्रत्वाने ओळख होऊ शकेल. स्वतः श्रीअरविंदांनी त्यांच्या तीव्र साधनेच्या काळात ईश्वराच्या कालीरूपाची साधना केली होती. किंबहुना, ते त्या कालावधीमध्ये जणू मूर्तिमंत कालीच झाले होते आणि म्हणून त्या काळातील पत्रांमध्ये श्रीअरविंद स्वतःच्या स्वाक्षरीऐवजी काली अशी मुद्रा लिहीत असत.

महाकालीचे विश्वरचनेमध्ये नेमके स्थान काय, तिचे कार्य कोणते यासंबंधी श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांनी जे सांगितले आहे, त्यावर 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक आधारित आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# महाकालीचे स्वरूप

## दिव्य मातेचे चार पैलू

भौतिक लीलेमध्ये दिव्य मातेचा जो व्यवहार चालतो, तिचे या विश्वाला जे मार्गदर्शन लाभते त्यामध्ये, दिव्य मातेचे चार महान पैलू, चार नेतृत्वकारी शक्ती आणि तिची चार व्यक्तित्वं अग्रस्थानी असतात.

शांत व्यापकता व आकलनकारी प्रज्ञा आणि प्रशांत कृपा व अक्षय करुणा, तसेच राज्यपदाला मागे टाकणारी, सार्वभौम, सर्व–सत्ताक महत्ता हे दिव्य मातेचे एक व्यक्तित्व होय. मातेचे दुसरे व्यक्तित्व म्हणजे तिच्या गौरवशाली सामर्थ्याची शक्ती, दुर्दम्य आवेग, तिची युयुत्सू भाववृत्ती, तिचा अत्याधिक तीव्र संकल्प, तिची त्वेषपूर्ण चपळता आणि विश्वाला हलवून टाकणारी तिची ताकद!

सौंदर्य, सुसंवाद, उत्कृष्ट लयतालबद्‌धता यांच्या गुप्त रहस्याची अद्‌भुतता, प्रफुल्लता, माधुर्य आणि गहन व सूक्ष्म समृद्धी, दिव्य मातेचे खिळवून ठेवणारे आकर्षण आणि तिची मनोहर कृपा हे दिव्य मातेचे तिसरे व्यक्तित्व होय. मातेचे चौथे व्यक्तित्व हे, तादात्म्यातून येणाऱ्या ज्ञानाची घनिष्ठ व गभीर क्षमता, काळजीपूर्वक केलेले निर्दोष कर्म आणि स्थिरता तसेच सर्व गोष्टींमधील अचूक परिपूर्णता या गोष्टींनी सुसज्ज असते.

'प्रज्ञा, सामर्थ्य, सुसंवाद आणि परिपूर्णता' हे दिव्य मातेचे गुणविशेष असतात. मातेची जी चार व्यक्तित्वं असतात ती व्यक्तित्वं हे चार गुणविशेष स्वतःसोबत घेऊन येतात. विभूतींच्या माध्यमातून मानवी रूप धारण करून ही व्यक्तित्वं येतात. दिव्य मातेच्या चैतन्यमय प्रभावाला जी व्यक्ती स्वत:ची पार्थिव प्रकृती थेटपणे खुली करू शकते, तिच्या त्या आरोहणामध्ये हे गुणविशेष दैवी प्रमाणात आढळून येतात. मातेच्या या चार व्यक्तित्वांना आपण अनुक्रमे महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती अशी चार महान नावं दिली आहेत.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 17-18)

*

## श्रद्धेच्या परिपूर्तीची परमावधी

आपल्या सामर्थ्याला नेहमीच दिव्य शक्तीवर असलेल्या आपल्या श्रद्धेचा आधार असला पाहिजे. जेव्हा त्या दिव्य शक्तीचा आविष्कार होतो त्यावेळी आपली ही श्रद्धा सर्वांगीण व परिपूर्ण असली पाहिजे किंवा झाली पाहिजे. आत्म्याच्या सर्वशक्तिमानतेने सुसज्ज असणाऱ्या आणि सनातन काळापासून अखिल सृष्टी निर्माण करत असलेल्या विश्वदेवतेला, म्हणजे जागृत चैतन्यमय विश्वशक्तीला अशक्य असे काहीच नसते. अखिल ज्ञानभांडार, सारी शक्तिसामर्थ्यं, सर्व प्रकारचे यश आणि विजय, सर्व प्रकारची कर्मं आणि कौशल्यं तिच्याच हाती असून, ती सर्व, विविध प्रकारच्या पूर्णत्वांनी व सिद्धींनी आणि आत्म्याच्या संपदांनी संपन्न असतात.

ती महेश्वरी आहे, सर्वोच्च ज्ञानदेवता आहे. सर्व प्रकारची सूक्ष्म दिव्य दर्शनशक्ती आणि सत्याची अपार असीमता, आध्यात्मिक संकल्पशक्तीची ऋजुता आणि तिच्या अतिमानसिक विशालतेची स्थिरता व उत्कटता तसेच तिच्या प्रबोधन शक्तीचा परमानंद ती आपल्याला प्रदान करते.

ती महाकाली आहे, सर्वोच्च शक्तिदेवता आहे. सर्व दिव्यबल आणि आध्यात्मिक शक्तिसामर्थ्य तिचेच आहे. तपःशक्तीची उग्रतम तीव्रता आणि युद्धाभिमुख शीघ्र चपळता त्याचबरोबर पराजय, मृत्यू आणि अज्ञानशक्ती यांना कःपदार्थ लेखणारा विजय व अट्टहास्य तिच्याजवळ आहे.

ती महालक्ष्मी आहे, सर्वोच्च प्रेम आणि दिव्यानंद यांची ती देवता आहे. आत्म्याचा कृपाप्रसाद, दिव्यानंदाची मोहिनी आणि सौंदर्य, त्याचबरोबर संरक्षण आणि सर्व प्रकारचे मानवी व दैवी आशीर्वचन हे तिचे वरदान आहे.

ती महासरस्वती आहे, आत्म्याचे कर्म आणि दिव्य कौशल्य यांची ती देवता आहे. योग कर्मसु कौशलम्, दिव्य ज्ञानाचा उपयोग

आणि जीवनामध्ये चैतन्याचे आत्म-उपयोजन (self-application) आणि त्याच्या सुसंवादाचे सौख्य हा तिचा योग आहे. तिच्या सर्वच रूपांमध्ये व शक्तींमध्ये, शाश्वत ईश्वरीच्या प्रभुत्वसंपन्नतेची परमश्रेष्ठ भावना असते. साधनाकडून (instrument) अपेक्षित असलेली सर्व प्रकारच्या कृतींची जलद आणि दिव्य क्षमता, एकत्व, सहभागी सहानुभूती तिच्या ठायी असल्यामुळे, सर्व जिवांमधील सर्व शक्तींशी मुक्त तादात्म्य तिच्यामध्ये असते आणि त्यामुळे, विश्वामधील सर्व ईश्वरी संकल्पाशी उत्स्फूर्त आणि फलदायी असणारी एक सुसंवादिता तिच्यामध्ये असते.

तिच्या अस्तित्वाची आणि तिच्या शक्तीची अतिशय सघन जाणीव होणे आणि आपल्या सभोवताली व आपल्या सर्वांगामध्ये होत असलेल्या तिच्या कार्याविषयी आपल्या समग्र अस्तित्वाने संतोषपूर्वक सहमती देणे, ही महाशक्तीवरील श्रद्धेच्या परिपूर्तीची परमावधी असते.

– श्रीअरविंद (CWSA 23-24 : 780-781)

*

## दिव्य मातेचे स्थान

साधक : काल रात्री मला माझ्या डोक्याच्या वरच्या बाजूस महेश्वरीचे दर्शन झाले, माझ्या प्राणिक अस्तित्वात महाकालीचे तर माझ्या मनामध्ये आणि हृदयामध्ये महालक्ष्मी स्थित आहे असे दर्शन मला झाले. त्यांच्या देहामधून विभिन्न प्रकाश प्रस्फुरित होत होता. नंतर माझ्या अस्तित्वामध्ये काही सूक्ष्म शक्ती अवतरित होत आहेत, असेही मला दिसले.

श्रीअरविंद : मनाच्या वरील उच्चतर चेतना हे महेश्वरीचे स्वाभाविक निवासस्थान आहे. कारण महेश्वरी ही ईश्वराची व्यापकता, विशालता आणि प्रज्ञा आहे.

महाकाली अगदी स्वाभाविक रितीने, शक्ती आणि ऊर्जा यांचे साधन असणाऱ्या उच्चतर प्राणामधून कार्य करते.

महालक्ष्मी ही हृदयाच्या माध्यमातून कार्य करते. तुमच्या बाबतीत सद्यस्थितीत ती मनाच्या माध्यमातूनदेखील कार्य करत आहे, असे दिसते. ही गोष्ट क्वचितच आढळते.

सहसा मनाच्या माध्यमातून महासरस्वती कार्य करत असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 66)

*

साधक : श्रीअरविंद यांनी 'द मदर' या पुस्तकात दिव्य मातेच्या ज्या चार पैलूंची गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत ती मला स्पष्ट करून सांगाल का? मला ती नीटशी समजत नाहीयेत.

श्रीमाताजी : अधिमानसाच्या वरच्या प्रांतात, उच्चतर प्रांतामध्ये दिव्य मातेच्या या पैलूंची रूपं अगदी साधीसरळ असतात आणि त्यांना इतके विविध चरण नसतात. दिव्य मातेच्या अदृश्य गुणवैशिष्ट्यांची प्रतीकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी माणसांनी त्यामध्ये बहुतांशी सगळे तपशील समाविष्ट केले आहेत, त्यामध्ये एवढी व्यामिश्रता आणली आहे. पण ही व्यामिश्रता वरकरणी आहे. तिची मूळ रूपं साधीसरळ असतात.

– श्रीमाताजी (CWM 15 : 17-18)

*

## महाकालीचे स्वरूप

महाकालीची प्रकृती निराळी असते. व्यापकता नव्हे तर उंची, प्रज्ञा नव्हे तर शक्ती व सामर्थ्य या तिच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता असतात. तिच्यामध्ये एक अत्याधिक प्रबलता असते; काही संपादन करण्यासाठी लागणारा शक्तीचा एक प्रचंड आवेग तिच्याममध्ये असतो, प्रत्येक मर्यादा आणि प्रत्येक अडथळा मोडून काढण्यासाठी तुटून पडणारी ईश्वरी उग्रता तिच्यामध्ये असते. तिची सारी दिव्यता वादळी कृतीच्या वैभवाद्वारे बाहेर उसळत असते. वेग, त्वरित परिणामकारक प्रक्रिया, शीघ्र व थेट दणका आणि ज्यापुढे सारे काही वाहून जाईल असा समोरून केलेला वार यामध्ये महाकाली असते.

असुरांसाठी तिची मुद्रा भयावह असते; ईश्वराचा द्‌वेष करणाऱ्यांसाठी तिची भावदशा घातक आणि निर्दयी असते कारण कोणत्याही लढाईपासून कच न खाणारी अशी ती, जगतांची योद्धा आहे. तिला अपूर्णता चालत नाही. माणसांमधील जे घटक परिपूर्णतेबाबत अनिच्छुक असतात अशा सर्वांशी ती कठोरपणाने वागते. जे हट्टाग्रहाने अज्ञानी व अंधकारयुक्त राहतात त्या सर्वांशी ती कठोरपणाने वागते. विश्वासघात, मिथ्यत्व आणि दुर्भावना यांच्याविरुद्धचा तिचा क्रोध तत्काळ व तीव्र असतो. दुरिच्छेवर तिच्या शस्त्राचा ताबडतोब प्रहार होतो.

महाकाली दिव्यकार्यामध्ये अनास्था, निष्काळजीपणा आणि आळस खपवून घेत नाही आणि तसे करणाऱ्या व्यक्तीवर, म्हणजे वेळीअवेळी झोपणाऱ्या आणि दिरंगाई करणाऱ्या व्यक्तीवर, गरज पडलीच तर ती तीव्र वेदनांच्या माध्यमातून एकाएकी आघात करते आणि त्याद्‌वारे ती अशा व्यक्तीला जागृत करते. वेगवान, सरळ आणि प्रांजळ असे आवेग, निरपवाद आणि हातचे काहीही राखून न ठेवता केलेल्या गतिविधी, ज्वालेसमान आरोहण करणारी अभीप्सा या साऱ्या गोष्टी म्हणजे महाकालीची गती असते. तिचे चैतन्य दुर्दम्य असते; तिची दृष्टी आणि तिचा संकल्प गरुडाच्या भरारीप्रमाणे उच्चस्थानी व दूरवर पोहोचणारा असतो; ऊर्ध्वगामी मार्गावर तिची पावले वेगाने पडत असतात आणि प्रहार करण्यासाठी तसेच साहाय्य करण्यासाठी तिचे बाहू सदैव फैलावलेले असतात. कारण (रौद्र रूपात असली तरी) तीदेखील माताच आहे आणि जसा तिचा क्रोध दुःसह असतो तसेच तिचे प्रेमही उत्कट असते. तिच्यापाशी एक अगाध आणि प्रचंड करुणा असते.

तिच्या शक्तिसामर्थ्यानिशी तिला हस्तक्षेप करू दिला तर, विसंगत गोष्टी, तसेच खीळ घालणारे अडथळे किंवा साधकावर हल्ला करणारे शत्रू या साऱ्यांचा ती क्षणार्धात पाडाव करते. तिच्या विरोधकांसाठी तिचा संताप भयावह असला आणि भित्र्या व दुर्बल व्यक्तींसाठी तिच्या दबावाची तीव्रता

जरी क्लेशकारक असली, तरीही थोर, बलवान आणि महात्म्यांकडून मात्र तिची पूजा केली जाते आणि ते तिची भक्ती करतात. कारण त्यांची अशी धारणा असते की, त्यांच्या स्थूलद्रव्यामध्ये जे बंडखोर घटक असतात त्यांचा महाकालीच्या प्रहारांमुळे पराजय होतो आणि सामर्थ्यामध्ये व परिपूर्ण सत्यामध्ये त्या घटकांचे परिवर्तन होते. जे काही कुचेष्टा करणारे आणि विकृत असते त्यावर महाकाली सरळ घणाघाती प्रहार करते आणि जे अशुद्ध किंवा दोषपूर्ण असते त्याला ती हद्दपार करते.

इतरांना जी गोष्ट करायला शतकानुशतके लागतील तीच गोष्ट करायला महाकालीला फक्त एक दिवससुद्धा पुरेसा असतो. तिच्याविना आनंद हा व्यापक, गभीर किंवा मृदू व मधुर आणि सुंदर असू शकतो पण सर्वाधिक उत्कटतेचा जो उसळणारा आनंद असतो तो मात्र तिच्याविना हरवला जाण्याची शक्यता असते.

ज्ञानाला ती विजयी प्रबलता प्रदान करते; सौंदर्य व सुसंवादाला ती उच्च, ऊर्ध्वगती देऊ करते आणि परिपूर्णतेसाठी जे संथगतीने पण कठोर परिश्रम करत असतात त्यांना ती चालना देते, त्यामुळे त्यांची शक्ती बहुगुणित होते आणि लांबचा मार्ग जवळचा होतो.

परमानंद, सर्वोच्च उंची, उदात्त ध्येयं, अतिविशाल दृश्यं यांच्यापेक्षा जे काही निम्न आहे त्याने तिचे समाधान होत नाही. त्यामुळे तिच्या सोबत ईश्वराची विजयी शक्ती असते आणि जी महान उपलब्धी प्राप्त करून घ्यायची आहे ती कालांतराने कधीतरी प्राप्त करून घेण्याऐवजी, तिच्या अग्नीच्या आणि आवेगाच्या आणि तिच्या वेगवानतेच्या कृपेमुळे ती अगदी या क्षणीदेखील प्राप्त होऊ शकते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 19-20)

*

वाचक अंकाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया
editorabhipsa2018@gmail.com या ईमेलवर कळवू शकतात.

## शिव आणि काली

साधक : आज प्रार्थनेच्या वेळी मला कालीमातेचे दर्शन झाले. ती कृष्णवर्णी व नग्न होती आणि तिने आपले चरण शिवाच्या पाठीवर ठेवलेले होते. मला कालीचे अशा रूपात दर्शन का झाले असावे आणि कोणत्या स्तरावरून तिचे असे दर्शन घडते?

श्रीअरविंद : हे कालीमातेचे प्राणिक स्तरावरील दर्शन आहे. ती संहारक शक्ती या रूपात आहे. येथे काली हे अडीअडचणींनी घेरलेल्या, अज्ञानातील प्राकृतिक शक्तीचे प्रतीक आहे. (अडीअडचणी, अज्ञान या) सर्व गोष्टींच्या अतीत होण्यासाठी, त्यांना पायदळी तुडवत, त्यांची तोडमोड करत त्या सगळयाच्या पार होऊन, जोपर्यंत ती स्वतः प्रत्यक्ष दिव्यत्वावर आरूढ होत नाही तोपर्यंत तिचा हा अंध संघर्ष चालूच राहतो. मात्र हे प्रत्यक्षात उतरल्यावर ती स्वतःच्या मूळ रूपात येते आणि तेव्हा मग संघर्ष व विनाश संपुष्टात येतो. तुम्हाला दिसलेल्या प्रतीकाचा हा अर्थ आहे.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 68-69)

*

## महाशक्ती आणि महाकाली

साधक : महाशक्तीची महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ही चार रूपं एकमेकींपासून स्वतंत्र आहेत का?

श्रीमाताजी : हो, ती रूपं काही विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वतंत्र आहेत, परंतु पूर्णपणे नाहीत. कधीकधी मात्र परस्परांहून अगदी पूर्णपणे स्वतंत्र भासतील इतकी ती रूपं भिन्न असतात आणि त्याच वेळी त्यांच्यामध्ये एक अगदी घनिष्ठ संपर्क असतो. किंबहुना, ही चार रूपं एकच असतात, केवल असतात. ही ‘महाशक्ती’ या जडभौतिक विश्वाची केंद्रवर्ती चेतना असते.

महाशक्तीचे हे विविध पैलू जरी परस्परांपासून काहीसे स्वतंत्र असले आणि त्यांच्या त्यांच्या स्वतःच्या अभीप्सांनुसार कार्यरत असले तरीदेखील

या पैलूंच्या कार्याचे नियमन करण्याची शक्ती नेहमीच महाशक्तीमध्ये असते. आणि ती त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकते.

उदाहरणादाखल महाकालीचे उदाहरण घेऊ. जर तिने हस्तक्षेप करायचा ठरविला असेल, पण जिच्याकडे स्वाभाविकपणेच गोष्टींकडे पाहण्याची अधिक समग्र आणि अधिक व्यापक दृष्टी असते, अशा 'महाशक्ती'ला जर असे आढळले की, महाकालीने हस्तक्षेप करण्याची ही योग्य घटिका नाही किंवा हस्तक्षेप करण्यात घाई होत आहे तर, ती महाकालीवर अगदी सहजपणे दबाव टाकू शकते आणि तिला सांगू शकते, ''शांत राहा.'' आणि मग महाकालीला शांत राहण्यावाचून पर्यायच राहत नाही आणि असे असूनसुद्धा ती बऱ्यापैकी स्वतंत्रपणे कार्य करत असते.

साधक : पण मग महाशक्ती महाकालीला तिचे कार्य का करू देत नाही? कारण इथे श्रीअरविंद असे म्हणतात की, ''जे करायला इतरांना शतकांचा काळ लागला असता ते महाकालीच्या हस्तक्षेपाने अगदी आत्ता या क्षणीसुद्धा घडून येऊ शकते.''

श्रीमाताजी : मी म्हणते, त्यासाठीच महाकाली असते आणि ती तिचे कार्य करत असते. परंतु कार्याकडे पाहण्याची महाकालीची एक विशिष्ट पद्धत असते... तिला कार्याची फक्त स्वतःचीच बाजू दिसत असते आणि महाशक्तीला मात्र समग्रपणे सर्व बाजू दिसत असतात, तेव्हा ती सांगते, ''नाही, आत्ता ही योग्य वेळ नाही.''

– श्रीमाताजी (CWM 06 : 289-290)

*

श्रीमाताजी : दुसऱ्या महायुद्धापासून मी कालीला शांत ठेवले आहे, पण ती आता अस्वस्थ झाली आहे.

काळ मोठा बिकट आहे, काहीही घडू शकते. लोकांनी त्यांचा अहंकार तेवढा सोडून दिला पाहिजे.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple, January 28, 1964)

*

## महाकालीचा हस्तक्षेप

साधक : श्रीमाताजींच्या महाकाली रूपाविषयी श्रीअरविंदांनी ‘द मदर’ या पुस्तकात असे लिहिले आहे की, ‘‘तिच्या शक्तिसामर्थ्यानिशी जर तिला हस्तक्षेप करू दिला तर, विसंगत गोष्टी तसेच खीळ घालणारे अडथळे किंवा साधकावर हल्ला करणारे शत्रू या साऱ्यांचा ती क्षणार्धात पाडाव करते.’’

महाकालीच्या शक्तीने हस्तक्षेप केला आहे, हे कसे जाणवते?

श्रीअरविंद : जेव्हा काहीतरी वेगवान, अचानक, निर्णायक आणि अत्यावश्यक असे घडते तेव्हा तेथे महाकालीच्या शक्तीने हस्तक्षेप केला आहे हे जाणवते.

जेव्हा ती हस्तक्षेप करते तेव्हा त्या पाठीमागे एक प्रकारे ईश्वराची किंवा अतिमानसाची मान्यता असते. ज्यावर कोणत्याही प्रकारची दाद मागता येत नाही अशा प्रकारच्या एखाद्या फर्मानासारखा तो हस्तक्षेप असतो. कारण तिच्या त्या हस्तक्षेपामुळे जे घडून आलेले असते ते मागे घेता येत नाही किंवा ती कृती रद्दबादल देखील करता येत नाही.

...महाकालीचे हे फर्मान निघण्यापूर्वी ज्या अडचणी अतिशय दुष्कर वाटत होत्या त्या अडचणींचा जोर या फर्मानामुळे उणावतो. त्या खरोखरच दुर्लंघ्य आहेत असे आधी वाटत असते, ते तसे वाटेनासे होते किंवा जर त्या अडचणी शिल्लक राहिल्याच तर थरथरणाऱ्या आणि अंततः मावळून जाणाऱ्या अशा क्षीण सावल्यांच्या रूपातच फक्त त्या शिल्लक राहतात.

मी येथे ‘हस्तक्षेप करू दिला तर,’ असा शब्दप्रयोग यासाठी केला कारण की, महाकालीची जी परमोच्च कृती असते ती तुलनेने अतिशय दुर्मिळ असते. मात्र इतर शक्तींच्या कृती किंवा महाकालीची आंशिक कृती या गोष्टी तुलनेने बऱ्यापैकी सार्वत्रिक असतात.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 115-116)

*

## महाकालीच्या कृती

साधक : तुम्ही महाकालीचे वर्णन करताना लिहिले आहे की, ''व्यापकता नव्हे तर उंची, प्रज्ञा नव्हे तर शक्ती व सामर्थ्य या तिच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता असतात.'' व्यापकता नव्हे तर उंची, यामधील 'उंची' या शब्दाचा नेमका अर्थ काय?

श्रीअरविंद : आपण म्हणतो ना, उच्च कल्पना, उच्च भावना, उच्च अभीप्सा, त्यासारखाच अर्थ येथे अभिप्रेत आहे. त्या अर्थाने महाकालीच्या कृती या उच्च असतात, त्या वेगवान असतात आणि ज्या कोणत्या घटकाला त्या कृतींचा स्पर्श होतो तो स्पर्श अतिशय परिणामकारक असतो, मात्र महेश्वरीसारखी तिची कृती व्यापक नसते किंवा सर्वसमावेशक, धीरयुक्त अशीदेखील नसते.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 114)

*

## महाकाली आणि दिव्य प्रेम

या सृष्टीमध्ये महाकाली ही दिव्य प्रेमाचे आविष्करण करते. परंतु तिचे प्रेम इतके शक्तिशाली आणि उदात्त असते की बहुतेक सर्वांनाच त्या प्रेमाची भीती वाटते.

– श्रीमाताजी (CWM 17 : 368)

*

दिव्य मातेच्या सर्व पैलूंपैकी एक पैलू असणारी काली माता ही चैतन्यपूर्ण आणि सक्रिय असे प्रेम सर्वाधिक शक्तीने अभिव्यक्त करते. आणि तिचे रूप कधीकधी अतिशय भयावह असे असले तरी, ती स्वतः स्वतःमध्ये सर्व–शक्तिमान प्रेमाचे वैभव बाळगून असते.

– श्रीमाताजी (CWM 15 : 16)

*

## महाकालीचे मूळ अधिमानसात

साधक : चंडी स्तोत्रामध्ये वर्णन करण्यात आलेले महाकालीचे

रूप आणि तिचे श्यामा रूप यांच्यामध्ये कोणता मूलभूत फरक आहे?

श्रीअरविंद : काली, श्यामा इत्यादी ही जी सर्वसामान्य रूपं आहेत ती प्राणाच्या माध्यमातून दिसून येतात; खऱ्या महाकालीच्या रूपाचे मूळ अधिमानसात (Overmind) आहे. महाकालीचे ते रूप कृष्णवर्णी किंवा श्यामवर्णी किंवा भयावह नाही, अगदी असुरांना जरी तिचे रूप भयावह वाटले तरीसुद्धा, ती सुवर्णमयी आणि सौंदर्यवान आहे.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 68)

*

## महाकाली आणि काली

साधक : श्रीमाताजींचे दर्शन मला कधीकधी महाकालीच्या रूपात होते तर, कधी ते विश्वात्मक मातेच्या रूपात किंवा कधी ते विश्वातीत मातेच्या रूपात होते. पण प्रत्येक वेळी त्या मला शुभ्रधवल रंगामध्ये दिसतात. कालीमातेला 'श्यामा' या नावाने संबोधले जाते, कारण ती कृष्णवर्णी आहे, हे मला माहीत आहे. पण मला तर श्रीमाताजी शुभ्रधवल रंगात दिसतात. असे का?

श्रीअरविंद : महाकाली आणि काली या एकसमान नाहीत. त्यातील काली हे कनिष्ठ रूप आहे. उच्चतर जगतांमध्ये वास्तव्य असणारी महाकाली ही सहसा सुवर्णमय रूपात दर्शन देते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 68)

*

## कालीमातेचे स्वरूप

...पृथ्वीच्या वातावरणात खरोखरच एक 'काली' असते की जी भौतिक गोष्टी हाताळत असते. ती स्वतंत्र असते असे म्हणावे तर, ती तशी स्वतंत्रही नसते किंवा ती 'महाकाली'ची अभिव्यक्तीदेखील नसते; परंतु ती सर्वस्वी महाकालीचे आज्ञापालन करत असते आणि तिच्यामध्ये महाकालीचे महत्त्वाचे गुण असतात. त्यांची शक्ती आणि कार्यक्षमता कमी झालेली असते पण ते गुण कालीमध्ये असतात आणि महाकालीच्या

प्रकृतीचे सौंदर्यदेखील तिच्यामध्ये असते.

केलेल्या दुष्कृत्याबद्दल व्यक्तीला ती स्वतःहून कधी शिक्षा करत नाही. तिची जे भक्ती करतात, त्यांना ती कधीही इजा पोहोचू देत नाही; जे देश तिच्याविषयी पुरेसा आदर करत नाहीत किंवा तिची कदर करत नाहीत, त्या देशांवरदेखील ती आघात करत नाही. परंतु तिला हिंसा आवडते, तिला युद्ध आवडते आणि तिचा न्याय निर्णायक असतो.

– श्रीमाताजी (CWM 04 : 397)

*

## कालीमातेचे कार्य

काली ही मनाच्या स्तरावर क्वचितच कार्य करते. उच्चतर क्षेत्रांमध्ये ती प्रेमाची शक्ती या रूपात कार्य करते. ती व्यक्तीला प्रगती आणि रूपांतरणाच्या दिशेने कृती करण्यास प्रवृत्त करते. प्राणिक स्तरावर ती मिथ्यत्व, ढोंगीपणा आणि दुरिच्छा यांच्या विनाशाची शक्ती म्हणून कार्य करते. जे जे कल्याणकारी, सत्यमय आणि प्रगतिशील आहे ते तिच्याकडून कधीही नष्ट केले जात नाही. उलट, ती त्याचे संरक्षण आणि जतन करते.

– श्रीमाताजी (CWM 15 : 16-17)

*

## महाकालीचे कार्य

साधक : येथे श्रीअरविंद आश्रमात महाकालीच्या उग्र कार्याचा अनुभव कोणाला आला आहे आणि तो त्यामधून यशस्वी रितीने बाहेर पडला आहे असे झाले आहे का?

श्रीअरविंद : असे मला किमान एक तरी उदाहरण माहीत आहे. एका साधकाने महाकालीला आवाहन केले होते आणि ती त्याच्यामध्ये पूर्णांशाने अवतरित झाली होती. तिच्या उग्र कार्यामुळे त्याच्यामधील जुने संस्कार, आसक्ती इत्यादी गोष्टी ढासळून पडल्या आणि त्यातून तो सहीसलामत बाहेर पडला.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 67)

**

# श्रीमाताजींचे शक्तिकार्य

## महेश्वरी आणि महाकाली

साधक : माझ्यामध्ये श्रीमाताजी महाकाली ऐवजी महेश्वरीच्या रूपात कार्य का करत आहेत? त्या माझ्यामधील त्यांचे कार्य इतक्या संथगतीने का करत आहेत? माझ्यामध्ये त्यांनी जर महाकालीच्या रूपात कार्य केले असते तर श्रीमाताजीरूपी तेजस्वी सूर्य माझ्यामध्ये उदय पावला असता आणि त्यामुळे मला घाबरविणाऱ्या आणि त्रास देणाऱ्या सर्व गोष्टी केव्हाच पळून गेल्या असत्या.

श्रीअरविंद : जेव्हा व्यक्तीचे आंतरिक अस्तित्व स्थिरशांत असते आणि सर्व अडचणींना अविचलपणे सामोरे जाण्याचा दृढ संकल्प तिच्यापाशी असतो तेव्हाच महाकाली त्या व्यक्तीमध्ये कार्य करू शकते. पण जेव्हा व्यक्तीमध्ये वरील दोन गोष्टी नसतात तेव्हा तिच्यामध्ये स्थिरशांती आणि व्यापकता येण्यासाठी फक्त महेश्वरीच कार्य करू शकते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 67)

*

## महाकालीची पद्धत

साधक : श्रीमाताजी महाकालीच्या पद्धतीचा अवलंब कधी करतात का?

श्रीअरविंद : श्रीमाताजी कधीकधी महाकालीच्या पद्धतीचा अवलंब करतात. (कोणत्या पद्धतीचा अवलंब करायचा) या सर्व गोष्टी समोरच्या व्यक्तीवर, तिच्या आंतरिक स्थितीवर आणि परिस्थितीवर अवलंबून असतात.

१) व्यक्तीमध्ये जेव्हा प्रगतीची एक तीव्र उत्कंठा असते आणि अगदी प्राणमय अस्तित्वामध्येसुद्धा कुठेतरी मूलभूत प्रामाणिकपणा असतो त्यावेळी श्रीमाताजी तेथे महाकालीच्या पद्धतीचा अवलंब करतात.

२) ज्या व्यक्ती श्रीमाताजींच्या निकट असतात आणि श्रीमाताजी

काहीशा कठोरपणे वागल्या तरी ज्या व्यक्ती त्यामुळे नाराज होत नाहीत किंवा गैरसमज करून घेत नाहीत, किंवा श्रीमाताजींचे तसे वागणे म्हणजे त्यांची अवकृपा झाली आहे किंवा त्यांचे आता माझ्यावर प्रेमच राहिलेले नाही असा गैरसमज ज्या व्यक्ती करून घेत नाहीत, उलट श्रीमाताजींचे ते तसे वागणे ही वस्तुतः कृपा आहे आणि त्यामुळे साधनेला साहाय्यच होणार आहे, अशी ज्यांना खात्री असते अशा व्यक्तींबाबत श्रीमाताजी महाकालीची पद्धत उपयोगात आणतात.

काही जणांना मात्र ही पद्धत पेलता येत नाही. श्रीमाताजींनी ही पद्धत त्यांच्याही बाबतीत उपयोगात आणली असती तर गैरसमजामुळे, बंडखोरीमुळे किंवा निराशेमुळे ते श्रीमाताजींपासून कित्येक कोस दूर गेले असते. पद्धत जवळची असू दे किंवा दूरची, ती वेगवान असू दे किंवा खडतर असू दे, प्रत्येक जिवाला त्याच्या त्याच्या प्रगतीसाठी पुरेपूर वाव मिळाला पाहिजे, असे श्रीमाताजींना अपेक्षित आहे आणि म्हणून त्यांना प्रत्येकाशी त्याच्या त्याच्या प्रकृतीनुसार वागावे लागते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 353)

*

## श्रीमाताजींची कार्यपद्धती

साधक : जेव्हा मला दिव्य चेतनेचा साक्षात्कार होईल तेव्हा माझी इच्छा आणि श्रीमाताजींचा संकल्प यामध्ये भेद राहणार नाही, हे खरे आहे का? अमुक एखादी गोष्ट जरी मला रुचणारी नसली तरीसुद्धा श्रीमाताजींनी त्यांना काय अपेक्षित आहे तेच मला सांगावे असे मला वाटते. ''अमुक एक गोष्ट करा'' किंवा ''अमुक एक गोष्ट करू नका,'' असे त्यांनी मला थेटपणे सांगावे असे मला वाटते.

श्रीअरविंद : जेव्हा दिव्य चेतनेचा पूर्णपणे साक्षात्कार होईल तेव्हा साधकाची इच्छा आणि श्रीमाताजींचा संकल्प यामध्ये कोणताच भेद शिल्लक राहणार नाही. तुम्ही म्हणता आहात तसे नाते निर्माण होण्यासाठी

साधकाला श्रीमाताजींच्या महाकाली म्हणून असलेल्या रूपाबद्दल भीती वाटता कामा नये आणि त्यांच्याकडून फक्त माधुर्याचाच अनुभव यावा अशी अपेक्षादेखील साधकाने बाळगता कामा नये. महाकालीचे प्रहार हे जणू आशीर्वादच आहेत अशा रितीने त्याला ते स्वीकारता आले पाहिजेत.

श्रीमाताजींच्या दिव्यदृष्टीवर, त्यांच्या न्यायनिवाड्यावर आणि त्यांच्या शब्दावर साधकाचा विश्वास असला पाहिजे. अन्यथा साधकाच्या अहंकाराला ठेच लागेल अशा रितीने त्या काही बोलल्या किंवा तसे त्यांनी काही केले तर तो अहंकार एकदम आक्रस्ताळेपणा करायला लागतो, स्वतःचे समर्थन करायला लागतो आणि श्रीमाताजींना नावे ठेवायला लागतो. व्यक्तीला अपेक्षित असते त्याप्रमाणे एखादी गोष्ट जेव्हा श्रीमाताजी करत नाहीत तेव्हा आश्रमातील कित्येक जणांना तसे वागण्याची जणू सवयच लागली आहे. पण श्रीमाताजींचा दृष्टिकोन योग्य रितीने स्वीकारणाऱ्या व्यक्ती फारच थोड्या आहेत. त्यांच्याबरोबर श्रीमाताजींचे तुम्ही म्हणता तसे नाते असते. पण श्रीमाताजींचा हा दृष्टिकोन स्वीकारू शकणार नाहीत अशी ज्या व्यक्तींची प्रकृती असते, त्यांच्याबरोबर श्रीमाताजींना त्या त्या व्यक्तीच्या प्रकृतीनुसारच वागावे लागते. (तेथे त्यांना महाकालीच्या पद्धतीने वागता येत नाही.)

– श्रीअरविंद (CWSA 32 : 353-354)

*

## महाकालीच्या प्रहारांचे स्वागत

साधक : माझ्या जीवनातील सर्व तपशील मी श्रीमाताजींना कळविले तर त्या माझ्यावर रागावतील अशी मला अकारण भीती वाटत असे आणि म्हणून कित्येक वर्षे ते तपशील लिहून कळविण्यास मी संकोच करत असे. पण आता मी काहीसा धीट झालो आहे आणि जरी त्या मला रागावल्या तरी त्यांची शक्ती माझ्यामध्ये कार्य करत आहे, हे आता मी अनुभवू शकतो. त्यांच्याच अनंत करुणार्द्रतेमुळे मी निर्भय झालो आहे.

श्रीअरविंद : श्रीमाताजींच्या रोषाला जर तुम्ही घाबरत असाल तर तुमची प्रगती कशी होणार? ज्यांना वेगाने प्रगती करण्याची इच्छा असते ते महाकालीच्या प्रहारांचेसुद्धा हसतहसत स्वागत करतात. कारण त्यामुळे ते मार्गावर त्वरेने प्रगत होतात.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 353)

*

## कालीमातेला आवाहन

एका पाठोपाठ एक येणाऱ्या अनेक जन्मांच्या कालावधीमध्ये, प्रगती करण्यासाठी आणि स्वतःला परिपूर्ण करण्यासाठी आपण या पृथ्वीवर आलो आहोत. या जन्मात आपल्याला जे साध्य होणार नाही, ते आपण पुढच्या वेळी साध्य करून घेऊ. आत्ता यावेळी आपण जी काही प्रगती करू ती आपल्याला नंतर उपयोगी पडेल.

जे कोणी महाकालीला आवाहन करतात, त्यांना ती नेहमीच साहाय्य करते आणि तिच्या साहाय्यामुळे प्रगती अधिक वेगाने होते.

– श्रीमाताजी (CWM 17 : 368)

*

## महाकालीचा प्रकाश

साधक : आज प्रणामाच्या वेळी मला श्रीमाताजींकडून एक सुवर्णमयी धाग्यासारखा प्रकाश माझ्या दिशेने येताना दिसला, मात्र तो काही क्षणातच नाहीसा झाला. पूर्वी एकदा जिन्यावरून खाली येण्यापूर्वी काही क्षण आधी जेव्हा श्रीमाताजी गच्चीवर उभ्या होत्या, तेव्हाही मला असाच प्रकाश अगदी स्पष्टपणे दिसला होता. हा प्रकाश माझ्या अंतरंगातून आला होता की बाहेरून? मला तो प्रकाश क्षणभरच दिसला त्यामुळे माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही.

श्रीअरविंद : सामान्य मानवी मनाच्या वर असलेल्या उच्चतर स्तरावरील दिव्य सत्याचा प्रकाश हा सुवर्णमय प्रकाश असतो; हा प्रकाश मूळ स्वरूपात अतिमानसिक प्रकाश (supramental light) असतो. हा

प्रकाश मनाच्या वर असलेल्या महाकालीचासुद्धा असतो. श्रीमाताजींमधून शुभ्रधवल प्रकाशाप्रमाणेच बरेचदा सुवर्णमय प्रकाशसुद्धा प्रस्फुरित होताना दिसून येतो.

*

साधक : एके रात्री मला अगदी शीतल, शांतिपूर्ण, विशाल असा, पिवळसर पांढरा प्रकाश वरून खाली येताना दिसला...

श्रीअरविंद : (तो प्रकाश कोणत्या स्तरावरून आला आहे हे) रंगांच्या छटांवरून ठरते. जर तो रंग सुवर्णमय शुभ्रधवल असेल तर, तो मनाच्या वरच्या पातळीवरून आलेला असतो आणि तुम्ही जी रंगसंगती सांगितलीत त्यावरून तो महेश्वरी–महाकाली (यांच्या एकत्रित) शक्तीचा प्रकाश असावा असे सूचित होते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 267-268)

*

## माझे आशीर्वाद

माझे आशीर्वाद हे धगधगत्या निखाऱ्यासारखे असतात. ते अमुक एका किंवा तमुक एका गोष्टीसाठी नसतात. तसेच ते एखाद्या व्यक्तीच्या विरोधात किंवा एखाद्या गोष्टीच्या विरोधात असे नसतात. ईश्वराचा संकल्प संपूर्ण ताकदीनिशी आणि ऊर्जेनिशी पूर्ण व्हावा यासाठी माझे आशीर्वाद असतात. त्यामुळे प्रत्येक वेळी त्यामध्ये (तुम्हाला अपेक्षित असलेले) यश मिळेलच असे आवश्यक नाही.

(अमुक एका गोष्टीबाबत किंवा अमुक एका व्यक्तीला) अपयश यावे असाच जर ईश्वराचा संकल्प असेल तर प्रसंगी अपयश देखील येऊ शकते. मात्र हा ईश्वरी संकल्प प्रगतीसाठीच असतो. म्हणजे तो त्या व्यक्तीच्या आंतरिक प्रगतीसाठी असतो असे मला म्हणायचे आहे.

तेव्हा जे काही घडेल ते सर्वोत्तम गोष्टीसाठीच घडेल, हे निश्चित.

– श्रीमाताजी (CWM 13 : 60-61)

*

## ईश्वरी शक्तीचा दबाव

साधक : ''श्रीमाताजी माझ्यावर दबाव टाकत आहेत,'' असे मला वाटत आहे, असे जेव्हा मी आज सकाळी म्हणालो तेव्हा, त्यावर तुम्ही मला असे लिहिले आहे की, 'दबाव' हा शब्द 'पूर्णपणे चुकीचा' आहे.

तसे जर असेल तर, तुम्ही 'द मदर' या पुस्तकात महेश्वरीबद्दल जे लिहिले आहे त्यात असे म्हटले आहे की, ''महेश्वरी त्यांच्यावर आवश्यक तेवढा दबाव टाकते,'' मग येथे त्या 'दबाव' या शब्दाचा अर्थ काय घ्यायचा?

तुम्ही महाकालीबाबतसुद्धा तसेच लिहिले आहे. ''महाकालीच्या विरोधकांसाठी तिचा संताप जरी भयावह असला आणि भित्र्या व दुर्बल व्यक्तींसाठी तिच्या दबावाची तीव्रता जरी क्लेशकारक असली, तरीही थोर, बलशाली व्यक्तींकडून आणि महात्म्यांकडून मात्र तिची पूजा केली जाते आणि ते तिची भक्ती करतात.''

श्रीअरविंद : मी तुम्हाला जे लिहिले आहे ते फक्त तुमच्या संदर्भातच होते. श्रीमाताजी दबावाचा कधीच अवलंब करत नाहीत, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नव्हता. मात्र दबावसुद्धा वेगवेगळ्या प्रकारचा असू शकतो. जेव्हा दिव्य शक्ती मन, प्राण किंवा शरीरामध्ये प्रविष्ट होते तेव्हा व्यक्तीला एक प्रकारचा दबाव जाणवतो. वेगाने प्रगती व्हावी यासाठी दबाव येऊ शकतो किंवा कोणत्या तरी गोष्टीची घडण करण्यासाठी, तयारी करण्यासाठी दबाव येऊ शकतो किंवा व्यक्तिमत्त्वातील एखाद्या अयोग्य गोष्टीचा बिमोड करण्यासाठी किंवा तत्सम अनेक कारणांसाठी दबाव येऊ शकतो. तुम्हाला जर कोणता दबाव जाणवतच असेल तर तो मदतीसाठी किंवा आधारासाठी किंवा विरोधी शक्तीच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी आलेला दबाव आहे. पण तरीसुद्धा त्याला 'दबाव' असे म्हणता येईल, असे मला वाटत नाही.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 114-115)

*

## महाकालीचे प्रहार

साधक : 'द मदर' या पुस्तकामध्ये तुम्ही महाकालीबद्दल असे लिहिले आहे की, ''प्रहार करण्यासाठी तसेच साहाय्य करण्यासाठी तिचे बाहू सदैव फैलावलेले असतात.'' येथे तुम्हाला 'प्रहार' या शब्दाचा अभिप्रेत असलेला अर्थ काय आहे?

श्रीअरविंद : महाकालीची या जगामध्ये जी सर्वसाधारण कृती असते ती येथे 'प्रहार' या शब्दामधून अभिव्यक्त झालेली आहे. ती असुरांवर प्रहार करते, जे नाहीसे होणेच आवश्यक आहे किंवा ज्याचा विनाश होणेच आवश्यक असते अशा सर्व गोष्टींवर, उदाहरणार्थ, साधनेमधील अडथळे वगैरे गोष्टींवर ती प्रहार करते. पण तुमच्या बाबतीत मात्र श्रीमाताजी महाकालीच्या शक्तीचा किंवा महाकालीच्या दबावाचा कधीही अवलंब करत नाहीत, हे मी तुम्हाला सांगायलाच हवे.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 115)

*

## कृष्ण आणि काली

(श्रीअरविंद सन १९१२ ते १९१९ या कालावधीत जी तीव्र साधना करत होते त्या दरम्यान ते कालीमातेची उपासनादेखील करत असत. त्या कालावधीतील त्यांच्या पत्रव्यवहारामध्ये, त्यांनी स्वतःच्या स्वाक्षरीच्या ऐवजी 'काली' अशी नाममुद्रा लिहिलेली आढळते. त्या काळात श्रीअरविंदांनी श्रीमाताजींना लिहिलेल्या पत्रामधील हा अंशभाग...)

दि. २३ जून १९१६

...(कनिष्ठ) प्रकृती ही भेदामध्ये, द्वैतामध्ये, दुःख आणि अपुऱ्या राहिलेल्या इच्छा-आवेगांमध्ये आणि कष्टामध्येच राहणे पसंत करते; ईश्वरी व्यापकता, आनंद आणि समता यांची सवय करून घेणे हे तिला काहीसे अवघड वाटते. विशेषतः या प्रकृतीमधील प्राणिक आणि शारीरिक घटकांना ती गोष्ट अधिक अवघड वाटते. मनाने ती गोष्ट जरी स्वीकारलेली

असली, त्याने त्या आनंदाचा, शांतीचा, एकत्वाचा अगदी दीर्घकाळ अनुभव घेतलेला असला, त्यामध्ये वसती केलेली असली तरीदेखील, शरीर आणि प्राण हे घटक मनाला खाली खेचत राहतात. आणि त्यामुळेच प्राण आणि शरीराचा धीक्कार करण्याकडे धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा एवढा तीव्र ओढा असतो आणि म्हणूनच, ते त्यावर विजय प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याऐवजी त्यांच्यापासून सुटका करण्याचे उद्दिष्ट बाळगत असले पाहिजेत, असे मला वाटते. परंतु विजय मिळवलाच पाहिजे; बंडखोरी करणाऱ्या या घटकांची सोडवणूक करून, त्यांना रूपांतरित केलेच पाहिजे; त्यांना धिक्कारता कामा नये किंवा त्यांना पिटाळूनही लावता कामा नये.

जेव्हा (मन, प्राण व शरीर यांच्यामध्ये) ही एकता सुयोग्य रितीने प्रस्थापित होईल तेव्हा, आपल्या कार्यापैकी जो स्थिर असा अर्धा भाग आहे तो पूर्ण झालेला असेल, परंतु सक्रिय असा अर्धा भाग अजून शिल्लक राहतो. तेव्हा मग, त्या 'एकमेवाद्वितीया'मध्ये आपण तो प्रभू आणि त्याची शक्ती यांना पाहिले पाहिजे. मी त्यांना आमच्या भारतीय धर्माच्या परिभाषेतील 'कृष्ण आणि काली' अशी नावे दिली आहेत. माझ्या प्रकृतीला आणि माझ्या समग्र अस्तित्वाला त्या दिव्य शक्तीने व्यापले आहे आणि दुसरेतिसरे काहीही शिल्लक न राहता, माझे अस्तित्व कालीमय झाले आहे; आणि तो प्रभू, माझ्या नव्हे तर, त्याच्या साध्यासाठी त्या शक्तीचा उपयोग करत आहे, तिला दिशा देत आहे, तिचा आनंद घेत आहे. त्यामुळेच मी स्वतःला त्याच्या विश्वात्मक अस्तित्वाचे केवळ एक केंद्र समजत आहे आणि एखाद्या जिवाने आत्म्याला जसा प्रतिसाद द्यावा त्याप्रमाणे मी त्याच्या कार्याला प्रतिसाद देत आहे. आणि जोपर्यंत मी म्हणजे 'कृष्ण आणि काली' यांची जणू प्रतिमूर्तीच बनत नाही तोपर्यंत हे कार्य करत राहण्याची जबाबदारी मी स्वीकारली आहे.

सर्व प्रकारच्या असफलता आणि पुन्हा पुन्हा तिथे तिथेच परतावे

लागत असूनसुद्धा, मी या अवस्थेपर्यंत येऊन पोहोचलो आहे. सामान्यतः विचार केला तर हे ठीक आहे, परंतु या स्थितीच्या तीव्रतेचा आणि सुरक्षिततेचा विचार करता, त्यामध्ये खरोखरच काही अपूर्णता अजूनही शिल्लक आहेत. पण जेव्हा ते प्रत्यक्षात (पूर्णतः) घडून येईल तेव्हा, त्या प्रभुच्या दिव्य ज्ञानाद्वारे, त्याच्या दिव्य शक्तीच्या कृतीचे नियमन केले जात असल्याची लीला आपल्यामध्ये चाललेली आहे, असे आपल्याला आढळेल अशी आशा आपण बाळगू शकतो. इतर सर्व म्हणजे त्याच्या जगत्-लीलेच्या विविध पातळ्या खुले होणे असते आणि जडभौतिक, शरीर व भौतिक जगत हे सत्य-स्वर्गांच्या उच्चतर कायद्याच्या अधीन होणे असते.

– श्रीअरविंद (CWSA 36 : 290)

*

**महाकालीचे प्रेम**

साधक : आज कालीमातेच्या पूजेच्या दिवशी जेव्हा तुम्ही आम्हाला महाकालीच्या रूपात दर्शन दिलेत तेव्हा 'द मदर' मध्ये असलेले श्रीअरविंदांचे पुढील वचन माझ्या मनःपटलावर तरळून गेले – ''साधकांच्या स्थूलद्रव्यामध्ये जे बंडखोर असे घटक असतात त्यांचा महाकालीच्या आघातांमुळे पराजय होतो आणि सामर्थ्यामध्ये व परिपूर्ण सत्यामध्ये त्या घटकांचे परिवर्तन होते; जे कुचेष्टा करणारे व विकृत असते त्यावर ती सरळ घणाघाती आघात करते आणि जे अशुद्ध किंवा दोषपूर्ण असते त्याला ती हद्दपार करते.'' महाकालीचे हे कार्य माझ्या बाबतीत प्रत्यक्षात येऊ दे, अशी प्रार्थना माझ्या हृदयामधून उमटली.

श्रीमाताजी : आज मी 'दिव्य प्रेम' या फुलांच्या (डाळिंबाच्या फुलांच्या) पाकळ्या प्रदान केल्या कारण महाकालीचे तिच्या लेकरांवर जे प्रेम असते त्या प्रेमापुढे इतर सर्व प्रकारचे प्रेम फिके ठरते.

– श्रीमाताजी (CWM 18 : 561)

**

# महाकालीची कार्यपद्धती

## महाकालीच्या कार्याचा अनुभव

(एका साधकाला लिहिलेल्या पत्रामधून...)

दिव्य शक्तीच्या कार्याचा अनुभव सहसा प्रवाहाच्या रूपात किंवा पर्जन्यवर्षावाच्या रूपात किंवा संथ पुराच्या रूपात येतो पण जेव्हा तो त्या रूपात येत नाही तेव्हासुद्धा तो महाकालीच्या कार्याचा निदर्शक असू शकतो, हे देखील खरे आहे. दिव्य प्रकाश असेल, शक्ती असेल, शांती असेल किंवा आनंद असेल; जे काही वरून येते ते लाटांच्या रूपातदेखील येऊ शकते. ...मात्र जेव्हा कधी असा अनुभव येतो तेव्हा भयभीत न होणे, ही पहिली आवश्यक गोष्ट असते.

– श्रीअरविंद (CWSA 30 : 475)

*

## महाकालीचा क्रोधाविष्कार

साधक : सध्या आश्रमवासीयांमध्ये एक विरोधी शक्ती कार्य करत आहे आणि तिला फक्त विध्वंस करायचा आहे, असे दिसते. (तिच्यामुळे पीडित असणारा) एखादा आश्रमवासी आश्रम सोडून गेला तरीसुद्धा ती शक्ती नाहीशी होत नाहीये, तर उलट ती दिवसेंदिवस अधिकच आक्रमक होत चालली आहे. आश्रमवासी जर एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहिले तर एका क्षणात तिला येथून निघून जाणे भाग पडेल. त्या हटवादी शक्तीला घालवण्यासाठी आणि आश्रमवासीयांची या दररोजच्या त्रासापासून सुटका व्हावी म्हणून मी योद्धारूप असणाऱ्या श्रीमाताजींच्या उत्कट प्रेमाला आणि महाकालीच्या क्रोधाला आवाहन करत आहे.

श्रीमाताजी : महाकालीचा क्रोधाविष्कार वेळोवेळी कार्य करत असतो. पण जे विरोधी शक्तींना प्रतिसाद देतात त्यांची स्वतःची त्या विरोधी शक्तींपासून सुटका व्हावी अशी इच्छा नसते आणि म्हणून महाकालीच्या कार्याचा प्रभाव टिकून राहत नाही. ते प्रामाणिक नसतात.

पण आपण मात्र अविचल राहिले पाहिजे आणि खात्री बाळगली पाहिजे. ईश्वरी कृपेबाबत असणारी आपली श्रद्धा आणि विश्वास अविचल ठेवला पाहिजे.

– श्रीमाताजी (CWM 18 : 143)

*

## विनाशकारी घटना

सर्व तऱ्हेच्या विनाशापाठीमागे मला कालीची शक्ती असल्याचे आढळते. रूपांतरणाची प्रगती अधिक वेगाने व्हावी म्हणून ती पृथ्वीच्या वातावरणात कार्य करत आहे, असे मला आढळून येते. म्हणजे भूकंप, ज्वालामुलीचा उद्रेक, चक्रीवादळं, महापूर इ. प्रचंड नैसर्गिक विनाश असो किंवा युद्ध, क्रांती, बंडं अशा प्रकारचा हिंसक मानवी विनाश असो, या दोन्ही प्रकारच्या आपत्तीच्या पाठीमागे (अस्मानी आणि सुलतानी संकटांच्या पाठीमागे) कालीच कार्य करत असल्याचे मला आढळून येते. केवळ सार रूपातच नव्हे तर, जे प्रत्यक्षातही दिव्य स्वरूपाचे असते ते मूलतःच अशा प्रकारच्या सर्व विनाशांच्या अतीत असते आणि त्यामुळे या विनाशाचा स्पर्श त्याला होऊ शकत नाही. अशा रितीने विनाशाच्या प्रमाणावरून अपूर्णतेचे प्रमाण किती आहे याचा अंदाज येतो.

अशा प्रकारच्या विनाशकारी घटना पुन्हा घडू नयेत असे वाटत असेल तर, खरा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे त्या घटनांपासून योग्य तो धडा घेतला पाहिजे आणि आवश्यक ती प्रगती करून घेतली पाहिजे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 17)

*

## कालीच्या शक्तीला आवाहन

साधक : माताजी, जेव्हा लोकं तुमच्या विरुद्ध काही बोलायला लागतात तेव्हा माझ्यामध्ये जणू काही एक भलीमोठी अनेकमुखी ज्वालाच उदयाला येते आणि मग तो विरुद्ध बोलणारा समोरचा माणूस एकदम दीनवाणा होऊन जातो, असे मला जाणवते.

श्रीमाताजी : तुम्ही तेव्हा कालीच्या शक्तीला आवाहन करत असाल म्हणून हे असे घडून येते.

*

साधक : मला अनेक वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवतो आहे. माझ्या एका मैत्रिणीने तुमच्याविषयी आणि श्रीअरविंदांविषयी काही अपशब्द काढले होते. मी तिला ताबडतोब गप्प केले पण माझ्या मनातील संतापाचा उद्रेक मात्र तसाच धगधगत राहिला. मला असे वाटत होते की, माझ्या छातीमधून अग्नीची जणू तलवारच बाहेर पडली होती आणि ती तास न् तास घणाघाती आघात करत होती. प्रत्यक्ष त्या हिंसेमध्ये माझ्या मनाचा फारसा वाटा नव्हता, माझे मन त्या क्रोधाग्नीला केवळ अचूक दिशा देण्याचे काम करत होते. दुसऱ्या दिवशी माझी ती मैत्रीण अतिसारामुळे आजारी पडली होती.

मी काल जेव्हा 'य'चे पत्र वाचले तेव्हा पुन्हा माझ्या छातीतून तसाच क्रोधाग्नी बाहेर पडू लागला. त्याचे नियतकालिक भस्मसात होऊन जाईल अशा रितीने त्या अग्नीला दिशा देण्यामध्ये मला काहीही गैर वाटले नाही. मी जणू काही त्याचा निःपात करण्यासाठीच आघात केला होता. अर्थात मी त्या हल्ल्याला स्वतःहून काही प्रोत्साहन दिले नाही. अशा व्यक्तीवर आघात करणे हे योग्य आहे किंवा नाही याविषयी माझ्या मनात प्रश्नचिन्ह निर्माण झाले. कधीकधी मला वाटते की, माझे वागणे योग्यच आहे. पण कधीकधी मला असे वाटते की, 'य' वर लक्ष केंद्रित करून मी स्वतःच आघात करण्याऐवजी, मी माझी क्रोधाग्नीरूपी ती तलवार तुम्हाला आणि श्रीअरविंदांना अर्पण करायला हवी होती आणि तिचा उपयोग कसा करायचा हे तुम्हा दोघांवर सोपवायला हवे होते. याबद्दल मला काही मार्गदर्शन मिळाले तर मी उपकृत होईन.

मी केवळ रागाच्या उद्रेकाविषयी बोलत नाही, हे कृपा करून लक्षात घ्यावे. अशा वेळी माझ्यासमोर जणू विनाश करू इच्छिणारी एक शक्ती

प्रकट होते आणि तिच्यामध्ये खरंच ती विनाशकारी शक्ती असते, हे मला जाणवते. अर्थातच त्या शक्तीचा माझ्या स्वतःच्या वैयक्तिक कारणांसाठी उपयोग करण्याचा विचारही कधी माझ्या मनाला शिवणार नाही.

श्रीमाताजी : हे उघड आहे की, येथे या उदाहरणात कालीची शक्ती कार्यरत झाली होती आणि तिनेच ती अग्नीरूपी तलवार तुमच्यामध्ये कार्यकारी केली होती. त्या कृतीमध्ये चुकीचे असे काहीच नाही. तो तुमचा वैयक्तिक क्रोधाग्नी नाही तर तो दिव्य शक्तीचा प्रकोप आहे आणि त्याला कृती करण्यासाठी संधी दिली गेलीच पाहिजे. एवढेच काय पण, मला तर असे वाटते की, तुम्ही स्वतः जरी त्या शक्तीच्या प्रकोपास रोखण्याचा प्रयत्न केला असता तरी तुम्ही तो प्रकोप थांबवू शकला नसता.

'य'ने स्वतःच स्वतःवर ही गोष्ट ओढवून घेतली आहे आणि त्यामुळे जे काही घडत आहे त्याबाबतीत चुकीचे असे काही नाही. तो स्वतःच त्याला जबाबदार आहे. अर्थात, ही शक्ती तुम्ही कोणत्याही वैयक्तिक उद्दिष्टासाठी किंवा स्वार्थी हेतुने उपयोगात आणता कामा नये.

– श्रीमाताजी (CWM 15 : 15-16)

*

## प्रामाणिकपणा आणि आघात

श्रीमाताजी : प्रामाणिक असणे खरोखरच खूप कठीण असते... आणि म्हणूनच वारंवार आघात होत राहतात. कधीकधी तर ते आघात अधिकच भयानक होतात कारण तुमच्यामधील मूर्खपणा नाहीसा करण्याचा तोच एकमेव मार्ग असतो; व्यक्तीवर संकटे का कोसळतात त्याचे हे कारण आहे. जेव्हा तुम्ही अतीव वेदनादायी अशा परिस्थितीमध्ये सापडलेले असता आणि तुमच्यावर खोलवर परिणाम करेल अशा परिस्थितीला तुम्हाला सामोरे जावे लागते, तेव्हाच तुमच्यातील मूर्खपणा थोड्याफार प्रमाणात तरी नाहीसा होतो. पण तो थोडा नाहीसा झाला तरी, अजूनही आतमध्ये थोडातरी शिल्लक असतोच आणि म्हणूनच

संकटादी साऱ्या गोष्टी इतक्या दीर्घकाळ चालू राहतात...

आपण म्हणजे कोणीच नाही, आपण काहीच करू शकत नाही, आपण अस्तित्वातच नाही, आपण खरोखर अगदी कोणीच नाही, त्या दिव्य चेतनेखेरीज आणि ईश्वरी कृपेखेरीज खरोखर कोणते अस्तित्वच नाही, याची व्यक्तीला अंतःकरणात खोलवर जाण येण्यासाठी जीवनामध्ये कितीतरी आघात आवश्यक असतात. ज्या क्षणी व्यक्तीला या गोष्टीची जाण येते त्या क्षणीच सारे दुःखभोग संपून जातात; सारी संकटे, अडचणी दूर होतात. व्यक्तीला जेव्हा हे पूर्णपणे कळते तेव्हा दिव्य चेतनेला विरोध करणारे तिच्यामध्ये काहीच शिल्लक राहत नाही... अर्थात या गोष्टीला खूप काळ लागतो.

साधक : मग व्यक्तीवर सर्व आघात एकदमच का होत नाहीत?

श्रीमाताजी : तसे झाले तर तुम्ही मरून जाल. कारण तो प्रहार जर तुम्हाला वठणीवर आणण्याइतपत पुरेसा जोरदार असेल तर तो तुम्हाला चिरडूनदेखील टाकू शकेल. तुमचं अगदी चिपाड होऊन जाईल. परंतु तुम्ही जर थोडी थोडी प्रगती करत राहिलात, आज थोडी, उद्या थोडी अशी क्रमाक्रमाने प्रगती करत राहाल, ते आघात पचवत राहाल तर मग तुम्ही टिकून राहू शकाल. अर्थातच ही गोष्ट आंतरिक सामर्थ्यावर, आंतरिक प्रामाणिकपणावर आणि प्रगती करण्याच्या क्षमतेवर, अनुभवातून शहाणपण शिकण्यावर आणि मुख्य म्हणजे, मी मगाशी म्हणाले त्याप्रमाणे ते शहाणपण विसरून न जाण्यावर अवलंबून असते. ते न विसरण्याइतपत जर व्यक्ती भाग्यवान असेल तर मग ती वेगाने प्रगती करू शकते. अशी व्यक्ती वेगाने पुढे जाऊ शकते.

आणि त्याच वेळी जर समजा व्यक्तीकडे आंतरिक नैतिक सामर्थ्य असेल तर, तिची प्रगती अधिक वेगाने सुद्धा होऊ शकते. म्हणजे समजा, व्यक्ती त्या दुःखाग्नीमुळे पोळून निघाली आणि त्याची धग कमी होऊ न देता जर ती व्यक्ती त्या दुःखाच्या मुळापर्यंत जाऊन पोहोचली तर,

तिची प्रगती अधिक वेगाने होऊ शकते. परंतु बहुसंख्य लोक एवढे सामर्थ्यशाली नसतात. उलट ते चटकन ती गोष्ट लपवून ठेवण्याचा, अगदी स्वतःपासूनसुद्धा ती गोष्ट लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. व्यक्ती स्वतःच स्वतःला अगदी क्षुद्र किरकोळ स्पष्टीकरणं देत असते. व्यक्तीने जो मूर्खपणा केलेला असतो त्यासाठी ती अनेकानेक कारणं सांगत असते.

साधक : एखाद्या व्यक्तीला किती आघात सहन करावे लागणार त्यांचे प्रमाण हे व्यक्तीवर अवलंबून असते का?

श्रीमाताजी : हो, ते व्यक्तींवर अवलंबून असते. म्हणजे मी म्हटले त्याप्रमाणे ते त्यांच्या प्रगती करण्याच्या क्षमतेवर, त्यांच्या सामर्थ्यावर आणि ईश्वरी शक्तीला त्यांच्याकडून होणाऱ्या प्रतिरोधावर अवलंबून असते. ज्यांना या आघातांची आवश्यकता नसते असे फारच थोडे जण असतात.

साधक : हे आघात महाकालीकडून होतात का?

श्रीमाताजी : महाकालीकडून? नाही, तसे काही आवश्यक नाही. तुम्ही जर विषप्राशन केलेत आणि त्यामुळे तुमच्या अंगात रक्त भिनले तर तो काही महाकालीचा दोष असणार नाही. हो ना? जिथे डोकं किंवा हातपाय किंवा पाठ मोडेल अशा स्थितीत एखादी व्यक्ती जर स्वतःहूनच गेली असेल तर त्याचा अर्थ असा की, ती व्यक्ती योग्य अशा संतुलित स्थितीत नाहीये. मग अशा वेळी त्या आघातासाठी तुम्ही दिव्य शक्तीला जबाबदार धरता कामा नये. तो त्या व्यक्तीच्या आंतरिक स्थितीचा किंवा तिने केलेल्या मूर्खपणाचा स्वाभाविक यांत्रिक परिणाम असेल.

साधक : महाकालीने केलेल्या प्रहाराचे स्वरूप कसे असते?

श्रीमाताजी : तिने केलेल्या प्रहारामुळे तुम्हाला खूप आनंद होतो. त्यामुळे तुम्हाला तुमच्या हृदयामध्ये एक गोडशी ऊब जाणवते. तुम्हाला समाधान वाटते.

साधक : व्यक्तीने तशी इच्छा बाळगली पाहिजे का? की तो प्रहार

आपोआपच होतो?

श्रीमाताजी : हो, व्यक्तीला प्रगती करण्याची खरोखरच इच्छा असली पाहिजे, त्या इच्छेमध्ये प्रामाणिकपणा असला पाहिजे. व्यक्तीने खरोखर अगदी प्रामाणिकपणे असे म्हटले पाहिजे की, ''हो, मला प्रगती करायची आहे'', ''काहीही झाले तरी मला प्रगती करायची आहे.'' तेव्हा मग महाकालीकडून प्रहार केला जातो. परंतु मी म्हटले त्याप्रमाणे, ज्यामध्ये उत्कट आनंदाची धारणा असते अशा समृद्धीच्या शक्तीसहित तो आघात होतो.

तुम्ही जर एकदा निर्णय घेतला असेल, उदाहरणार्थ, स्वतःमधील एखादी चुकीची सवय थांबविण्याचा निश्चय केला असेल, किंवा तुम्ही जी चूक एकदा केली होती तीच पुन्हा न करण्याचा निश्चय केला असेल किंवा करायला अवघड वा अशक्यप्राय आहे आणि तरीही ती केली पाहिजे, अशी कोणतीतरी गोष्ट करण्याचा निर्णय तुम्ही घेतला असेल आणि असा निर्णय घेऊन, स्वतःच्या इच्छेबाबत तुमच्यापाशी पूर्ण प्रामाणिकपणा असेल तर, अशा वेळी तुम्ही जे करायचे ठरविले आहे तेच करण्यास भाग पाडण्यासाठी तुमच्यावर जर प्रचंड आघात झाला, तर तो आघातच असतो पण तेव्हा तुम्हाला तुमचा गौरव झाल्यासारखे वाटते, तुम्ही आनंदी होता, तुम्हाला हृदयामध्ये काहीतरी भव्योदात्त असे वाटू लागते.

निव्वळ बाह्यवर्ती, यांत्रिक, भौतिक चेतनेमध्ये आणि अज्ञानदशेमध्ये जीवन जगत असताना, ज्या ज्या मूर्खपणाच्या गोष्टी तुम्ही करता, त्याचे स्वाभाविक परिणाम म्हणून अटळपणे आणि अघटितपणे तुमच्यावर होणारे आघात आणि तुम्ही स्वतःवर प्रभुत्व मिळविण्याचा निश्चय केल्यानंतर, तुम्ही ज्या उच्चतर अवस्थेत उन्नत होता आणि काहीही झाले तरी, सत्याच्या चेतनेमध्येच जीवन व्यतीत करायचा तुम्ही निर्धार करता, प्रगतीसाठी कोणतीही किंमत मोजावी लागली तरी चालेल पण प्रगती करायचीच, असे जेव्हा तुम्ही ठरविता तेव्हा अशा तुमच्या उच्चतर

अवस्थेमध्ये, तुमच्यावर होणारे आघात यांमध्ये जमीन–अस्मानाचे अंतर असते.

या उच्चतर अवस्थेमध्ये तुमच्या बाबतीत ज्या घटना घडतात त्या इतक्या अर्थपूर्ण असतात की, तुम्हाला त्या घटनांमध्ये झळाळत असणारे सत्य स्पष्टपणे दिसून येते; जणू काही तुम्हाला दीपस्तंभ दिसावा त्याप्रमाणे तुमचा मार्ग उजळवून टाकणारा प्रकाश तुम्हाला दिसतो, तो प्रकाश तुम्हाला मार्गदर्शन करतो आणि हे सारे तुम्हाला स्पष्टपणे दिसून येते. तुमच्या पाठीवर एखादा धोंडा येऊन कोसळावा त्याप्रमाणे तो आघात तुमचा विनाश करणारा नसतो तर, त्यामध्ये उत्कट दीप्तिमानता असते. आणि म्हणूनच असे म्हटले जाते की, फक्त पहिल्या पायरीवरच प्रयत्नांची खरी आवश्यकता असते.

येथे पहिली पायरी म्हणजे त्या अज्ञानदशेच्या पातळीवरून बाहेर पडून तिच्या वर असणाऱ्या पातळीवर चढून जाणे आणि असे झाल्यानंतर मग सारे, सारे काही बदलून जाते. परंतु व्यक्तीने त्या पातळीवरून पूर्णतः बाहेर पडले पाहिजे, तिने तिथेच थांबून राहता कामा नये, व्यक्तीने दोन दगडांवर पाय ठेवता कामा नये, कारण तसे चालत नाही.

– श्रीमाताजी (CWM 06 : 323-326)

*

## कालीमातेची पद्धत

(भारतभरात कालीमातेची पूजा केली जाते. विश्वमातेच्या योद्धा या स्वरूपाचे हे पूजन असते. त्या पार्श्वभूमीवर श्रीमाताजी सांगत आहेत...)

गेल्या दोन दिवसांपासून कालीमाता येथे उपस्थित आहे आणि काल तर ती, योद्ध्याच्या भावावस्थेमध्ये होती. मी तिला म्हणाले, ''(प्रगती आणि परिवर्तन करण्याची ज्यांची प्रामाणिक इच्छा आहे त्यांच्यावर) प्रेमातिरेकाचा वर्षाव करून त्यांचे परिवर्तन का करू नये?''

तेव्हा ती म्हणाली, ''प्रथम त्यांच्या छातीवर एक जोरदार प्रहार

केला पाहिजे आणि जेव्हा ते खाली जमिनीवर कोसळतील, त्यांची दमछाक होईल, तेव्हा त्यांची परिवर्तनासाठी तयारी झालेली असेल. पण त्यापूर्वी नाही.'' अर्थात हे तिचे मत होते.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple : October 19, 1960)

*

## रूपांतरण आणि महाकालीची शक्ती

साधक : दिव्य प्रेम आणि महाकालीची शक्ती या दोन्हीपैकी रूपांतरणाच्या दृष्टीने अधिक वेगवान कोण?

श्रीमाताजी : जे दिव्य प्रेमाप्रत अजूनही खुले झालेले नसतात फक्त त्यांच्याच रूपांतरणासाठी कालीच्या शक्तीचा अवलंब करण्याची आवश्यकता असते. मात्र जे दिव्य प्रेमाप्रत खुले झालेले असतात त्यांना रूपांतरणासाठी इतर कशाचीच आवश्यकता नसते.

– श्रीमाताजी (CWM 16 : 370)

*

## अतिमानसिक प्रकाश आणि विजय

हे जग सध्या संकटकाळातून चाललेले आहे. माणसं मरण पावत आहेत, बाँब टाकले जात आहेत, जहाजांना जलसमाधी मिळत आहे. मी गेले दोन दिवस गोष्टी सुरळीत करण्यात व्यग्र होते. मला या जगामध्ये ईश्वराचा विजय होणे अपेक्षित आहे. या जगामध्ये मला शांती आणि सुसंवाद अपेक्षित आहे. आजच्या आणि उद्याच्या दिवसाच्या दरम्यान असणारी आजची रात्र ही कालीमातेची आहे. हे जग अतिमानसिक प्रकाशाप्रत खुले होऊ दे आणि त्या प्रकाशाद्वारे हिंसा, वेदना किंवा विध्वंस न होता, या जगाचे रूपांतरण होऊ दे, असे मी तिला सांगितले आहे. या पृथ्वीवर सत्याचा विजय व्हावा हे मला अपेक्षित आहे. आपण विजयश्री खेचून आणली पाहिजे.

– श्रीमाताजी (Mother you said so : 36)

**

# महाकालीचे विविध रूपांमधील दर्शन

## घाबरू नका

तुम्ही कशालाही घाबरता कामा नये. तुम्हाला रूपांतरण घडवायचे असेल तर हा पहिला धडा आहे. म्हणून प्रत्येकाने भीतीवर विजय मिळविलाच पाहिजे. तुम्हाला भीती वाटते तेव्हा तुम्ही पटकन ईश्वराचा आश्रय घेतला पाहिजे आणि प्रत्येक गोष्टीत ईश्वरच आहे, असा विचार तुम्ही केला पाहिजे. तुम्ही जर असा विचार केलात तर, सर्व गोष्टी अगदी आनंदमय आणि अद्भुत बनतील कारण खरोखरच, ईश्वर या चराचरात व्यापून राहिलेला आहे. त्यामुळे घाबरण्यासारखे काहीच नाही.

एकदा रामकृष्ण परमहंस एका मोठ्या वृक्षाखाली ध्यान करत बसले होते. तेव्हा एक भलामोठा नाग आला आणि त्याने रामकृष्णांच्या मनगटाला दंश केला. रामकृष्ण ध्यानावस्थेतून बाहेर आले, त्यांनी त्यांचे मनगट चोळले आणि त्या नागाला उद्देशून ते म्हणाले, ''हे कालीमाते, तू मला दंश का केलास?'' रामकृष्णांनी असे म्हणण्याचा अवकाश, त्या दंशाचा कोणताही त्रास न होता, ते त्यातून सहीसलामत बाहेर पडले होते.

मथितार्थ असा की, तुम्ही कोणत्याही गोष्टीला घाबरता कामा नये.

– श्रीमाताजी (Mother you said so : 21)

*

## दिव्य मातेचे कार्य

साधक : सर्व सृष्टी हे दिव्य मातेचे कार्य आहे, त्यामुळे अवतार किंवा विभूती या पृथ्वीवर अवतरित होण्यासाठी आवश्यक असणारी परिस्थिती निर्माण करण्याचे कार्यसुद्धा मातेच्या व्यक्तित्वांद्वारेच पडद्याआडून केले जात असते, असे आपण म्हणू शकतो का?

श्रीअरविंद : तुम्हाला जर येथे दिव्य मातेची दिव्य व्यक्तिमत्त्वं असे म्हणायचे असेल तर, त्याचे उत्तर 'होय' असे आहे.

पुढे जाऊन असेही म्हणता येईल की, प्रत्येक विभूतीने तिची

ऊर्जा दिव्य मातेच्या (महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती) या चार व्यक्तित्वांपैकी कोणत्या ना कोणत्या व्यक्तित्वाकडून घेतलेली असते. उदाहरणार्थ, नेपोलियनला महाकालीकडून ऊर्जा मिळालेली होती, श्रीरामाला महालक्ष्मीकडून, तर ऑगस्टस कैसरला महासरस्वतीकडून ऊर्जा मिळालेली होती.

– श्रीअरविंद (CWSA 35 : 113)

*

## महाकालीच्या प्रतिमांपाठीमागील वास्तव

(श्रीमाताजींनी श्रीअरविंदलिखित 'द मदर' या ग्रंथातील महाकालीशी संबंधित असलेला एक उतारा वाचून दाखविला. त्यावरील हा संवाद...)

साधक : महाकालीच्या प्रतिमेविषयी ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या खऱ्या असतात का?

श्रीमाताजी : मला वाटते, मी मागे एकदा तुम्हाला सांगितले होते की, मूळ पुरुष हे त्यांच्या उच्चतर वास्तवामध्ये असतात आणि ते एका विशिष्ट प्रकारचे असतात. ते जसजसे पृथ्वीच्या नजीक येऊ लागतात, अधिकाधिक भौतिक प्रांतांमध्ये आविष्कृत होऊ लागतात, तसतसे ते विविध रूपं धारण करतात आणि ते विलक्षण रितीने अनेक पटीने वाढत जातात.

श्रीअरविंद इथे ज्या जिवांबद्दल बोलत आहेत ते जीव अतिमानसाच्या (Supermind) जवळ असणाऱ्या प्रांतांमधील असतात, ते अजूनही बऱ्यापैकी स्पष्टपणे त्यांच्या अतिमानसिक उगमाच्या जागृत संपर्कामध्ये असतात. श्रीअरविंद ज्याला 'अधिमानस' (Overmind) असे संबोधतात त्यामध्येही हे जीव आविष्कृत होतात आणि तिथे त्यांची रूपं ही अधिक स्पष्ट, काहीशी अधिक नेमकी असतात पण शक्ती व क्षमतेमध्ये मात्र ती उणी असतात. आणि मग या अधिमानसातून ती रूपं मानवी मनामध्ये, पार्थिव मनांमध्ये उतरतात...

उदाहरणादाखल, बिचाऱ्या महाकालीचेच उदाहरण घेऊ. तुमच्याकडे तर बहुसंख्य काली असतात. एकापेक्षा दुसरी अधिक भयावह असते; काही काही तर फारच भीतीदायक आणि भयावह असतात. निव्वळ मानवी कल्पनांमधून साकारल्या गेलेल्या त्या, कधीकधी तर अगदी घृणास्पद अशा बनतात. त्यांचे बाह्य रूप हे मानवी कल्पनेमधून, कल्पना करण्याची क्षमता असणाऱ्या मानवी मनातून साकारलेले असते. त्यामध्ये महाकालीच्या शक्तीचे एक पुसटसे प्रतिबिंब असू शकते; पण ते इतके धूसर, इतके विरूपित, इतके खुजे असते, ते इतके मानवी चेतनेच्या श्रेणीत आणून बसविलेले असते की ते पाहून, ती महाकाली स्वतःच असे ठामपणे म्हणू शकेल की, 'ही मी नव्हे.'

महाकालीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिमांमध्ये मी सर्व संभाव्य भयानकता पाहिल्या आहेत. जर कोण्या महान शिल्पकारांनी त्या मूर्ती घडविल्या असतील तर त्यामध्ये महाकालीचे सौंदर्य थोडेफार तरी उतरलेले असते; परंतु बहुतेक वेळा मूर्तिकार अकुशल असतात आणि त्यामुळे त्या मूर्तींमध्ये काहीच सौंदर्य उतरलेले नसते.

मंदिरांमध्ये जेव्हा प्रतिमांची (मूर्ती किंवा चित्र) प्राणप्रतिष्ठा करायची असते तेव्हा तेथे एक धार्मिक विधी केला जातो. त्या पुजाऱ्याकडे किंवा त्याच्या साहाय्यकाकडे जर काही गूढ शक्ती असतील तर, अगदी मर्यादित का असेनात, पण त्या आवाहनाद्वारे आणि धार्मिक विधींद्वारे, ते पार्थिवतेच्या पलीकडची चेतना त्या प्रतिमांमध्ये उतरवू शकतात. मग तुम्हाला असे सांगण्यात येते की, ''हा केवळ लाकडी ओंडका नाही, ही पाषाणाची मूर्ती नाही, हे केवळ एक चित्र नाही; धार्मिक विधीच्या द्वारे यामध्ये शक्ती उतरविण्यात आली आहे आणि आता तुम्ही त्या शक्तीशी बोलू शकता.'' हे योग्य आहे, पण त्या पुजाऱ्याची प्रकृती, त्याच्यापाशी असलेले अतींद्रिय ज्ञान आणि त्याला ज्या शक्तींविषयी आत्मीयता आहे, त्या सर्व गोष्टींची माहिती तुम्हाला असली पाहिजे.

...मी महाकालीचे उदाहरण दिले कारण सहसा मानवी चेतनेमध्ये महाकालीची संकल्पना प्रामुख्याने भयावह अशी असते. व्यक्ती जेव्हा इतर देवदेवतांकडे जाते, उदाहरणार्थ महासरस्वती, जिच्याकडे सर्व प्रकारच्या कला, साहित्य आणि इतर क्षमता असल्याचे सांगितले जाते, तिची संकल्पना मात्र तितकीशी भयावह नसते. पण खास करून महाकाली... तिची शक्ती, सामर्थ्य, तिची युद्धप्रिय ऊर्जा या साऱ्या गोष्टी माणसांच्या संकल्पनेत इतक्या भयावह असतात की, त्या संकल्पना जेव्हा ते मूर्तीच्या रूपात प्रत्यक्षात उतरवतात तेव्हा त्या गोष्टी त्या मूर्तीची पूजा करणाऱ्या भक्तांसाठी काहीशा धोकादायक ठरतात.

भारतात आल्यापासून मी अशा असंख्य गोष्टी ऐकल्या आहेत. अशा असंख्य मूर्तींशी माझा संपर्क आला आहे. ज्यांच्या घरात कालीची पूजा केली जाते अशा लोकांच्या बाबतीत काही भयानक गोष्टी घडलेल्या आहेत अशीही अनेक उदाहरणे मला माहीत आहेत. मी नेहमीच त्यांना सावध करत असते, मी त्यांना सांगते की, ''तुमच्या दुर्दैवाला 'महाकाली' कारणीभूत आहे असे समजू नका, कारण ती खरोखर तशी कारणीभूत नसते. तुमच्या घरामध्ये जी काली आहे तिने एखाद्या सूडबुद्धी असलेल्या जिवाला आश्रय दिलेला असू शकतो. कदाचित अतिशय मत्सरी, अत्यंत दुराग्रही आणि ज्याच्याकडे बदला घेण्याची तीव्र भावना आहे अशा एखाद्या जिवाला तिच्या माध्यमातून आश्रय मिळालेला असू शकतो आणि तुमची तिच्यावर श्रद्धा असल्याने आणि बहुतेक वेळेला ती प्राणिक शक्ती असल्याने अशा प्रकारचे घातक परिणाम खरोखरच दिसून येतात.''

अशा तऱ्हेचे सगळे दुर्दैवी अनुभव आल्यानंतर ज्यांनी महाकालीची मूर्ती गंगेत विसर्जित केली आहे, अशीही काही माणसं मला माहीत आहेत. पण जर का त्याचवेळी ते त्या भावनेपासून सुटका करून घेऊ शकले असते तर, त्यांचे ते सारे नुकसान झाले नसते. पण त्यांनी जे काही केलेले असते त्यामुळे, त्यांच्यापैकी काहीजण इतके भयभीत झालेले

असतात की त्यामुळे ते वाईट परिणाम ती मूर्ती विसर्जित केल्यानंतरसुद्धा तसेच कायम राहतात.

– श्रीमाताजी (CWM 04 : 395-397)

*

## भारतमाता – महाकालीचा देह

आपण भारतीय आहोत, आपण आर्य आहोत. आपल्याला आता पुन्हा एकदा आपल्या राष्ट्रीयत्वाची जाणीव झाली आहे पण जोपर्यंत आपण देशप्रेमामध्ये आकंठ बुडून जात नाही तोपर्यंत, ही राष्ट्रीय चेतना (खऱ्या अर्थाने) बहराला येऊ शकत नाही. मातृभूमीची सेवा हाच आमच्या देशप्रेमाचा आधार असणे आवश्यक आहे.

बंकिमचंद्र लिखित गीत, 'वंदे मातरम्' जेव्हा आमच्या बाह्य इंद्रियांचे बांध भेदून, हृदयापर्यंत जाऊन पोहोचले, त्याच दिवशी आमच्या हृदयांमध्ये देशप्रेमाचा उदय झाला आहे. त्याच दिवशी आमच्या मातृभूमीची प्रतिमा आमच्या हृदयांमध्ये विराजमान झाली आहे. हा देश म्हणजे माता आहे, हा देश म्हणजे ईश्वर आहे, ही उदात्त धारणा उपनिषदांतील शिकवणुकीचा एक भाग आहे आणि ही धारणा हेच राष्ट्रीयत्वाच्या उदयाचे बीज आहे.

ज्याप्रमाणे जीव हा ईश्वराचा एक अंश असतो, जिवाची शक्ती ही त्या ईश्वरी शक्तीचा एक भाग असते, त्याप्रमाणे सत्तर लाख बंगाली लोक, किंबहुना तीस कोटी भारतीयांचा समूह हा सर्वव्यापी वासुदेवाचा एक अंशभाग आहे. अगदी त्याचप्रमाणे, अनेकानेक हात आणि विविध शक्तिसामर्थ्यांनी सुशोभित असलेली, तीस कोटी जनतेचे आश्रयस्थान असलेली भारत माता, ही शक्तीचे मूर्तिमंत रूप आहे. दिव्य मातेची ती शक्ती आहे. भारत माता ही वैश्विक महाकालीचा मूर्तिमंत देह आहे.

– श्रीअरविंद (CWSA 09 : 221-222)

*

## श्रीअरविंदांना झालेला साक्षात्कार

(श्रीअरविंद बडोदा येथे वास्तव्यास होते. त्या वास्तव्याच्या शेवटच्या

कालखंडामध्ये म्हणजे इ. स. १९०४ ते १९०६ या दरम्यान श्रीअरविंदांनी त्यांना आलेल्या एका अनुभूतीवर १३ सप्टेंबर १९३९ रोजी हे काव्य लिहिले होते.

गुजरातमधील चांदोड येथे दौऱ्यावर गेले असताना श्रीअरविंद नर्मदा नदीच्या काठावर कर्नाळी येथे असलेल्या कालीमातेच्या एका मंदिरात गेले. जेव्हा ते त्या मंदिरात गेले तेव्हा त्यांना तेथील मूर्तीमध्ये एक जिवंत अस्तित्व जाणवले. त्या मूर्तीकडे पाहिल्यावर त्यांच्या आंतरिक दृष्टीला जाणवले की, ती जगन्माता आहे. एक प्रकारे मूर्तिपूजेपाठीमागे असलेले सत्यच त्यांना तेथे उमगले. पुढील काव्यरचना ही श्रीअरविंदांच्या याच अनुभवावर आधारलेली आहे.)

देवदेवतांच्या त्या नगरीमध्ये,
एका लहानशा मंदिरात स्थापित केलेली,
शिल्पाकृतीतील ती 'देवता' माझ्याकडे पाहत होती.
ती देवता म्हणजे एक अमर आणि दिव्य अशी
जिवंत 'उपस्थिती' होती,
त्या शिल्पाकृतीमध्ये सर्व अनंतता सामावलेली होती.

ती महान जगन्माता आणि तिचा शक्तिशाली संकल्प
पृथ्वीच्या निगूढ निद्रेमध्ये वसतीला आला होता.
निःशब्द, सर्वशक्तिशाली, अतर्क्य असणारी अशी ती
वाळवंटामध्ये, आकाशामध्ये आणि गहनतेमध्येही मूक होती.

सध्या ती मनरूपी पडद्याआड राहते
आणि ती पूर्णपणे निःशब्द आहे.
निःशब्द, अतर्क्य, सर्वज्ञ असणारी अशी ती
जोपर्यंत तिच्या अनोख्या अवताराचे रहस्य
आपला आत्मा समजावून घेत नाही, ऐकून घेत नाही

तोपर्यंत आपल्यापासून ती लपलेलीच राहते.

तो अचल आकार आणि पुजारी,
आता एकाकार झाले आहेत
पाषाण किंवा रक्तामांसाचा देह
यांनी एक सौंदर्य आणि एक रहस्य परिधान केले आहे.

– श्रीअरविंद (CWSA 02 : 608)

*

## हे कालीमाते

हे वरुणा, तू माझ्यामध्ये विशाल रूप धारण कर.
हे इंद्रा, तू माझ्यामध्ये बलशाली रूप धारण कर.
हे सूर्या, तू माझ्यामध्ये प्रकाशमान आणि तेजोमय रूप धारण कर.
हे चंद्रा, तू माझ्यामध्ये मधुर आणि मोहक रूप धारण कर.
हे रुद्रा, तू माझ्यामध्ये रौद्र आणि भयावह रूप धारण कर.
हे मरुता, तू माझ्यामध्ये जहाल आणि वेगवान रूप धारण कर.
हे अर्यमा, तू माझ्यामध्ये बलवान आणि धाडसी रूप धारण कर.
हे भगा, तू माझ्यामध्ये आनंद आणि सौख्य निर्माण कर.
हे मित्रा, तू माझ्यामध्ये सौम्य, दयाळू, प्रेमळ व राजसी रूप धारण कर.
हे उषादेवते, तू तेजस्वी आणि प्रकाशदायी रूप धारण कर.
हे निशादेवते, तू गभीर आणि प्रसवा रूप धारण कर.
हे जीवना, तू परिपूर्ण, सुसज्ज आणि उल्हसित असावेस.
हे मृत्यो, एका निवासस्थानाकडून दुसऱ्या निवासस्थानाकडे
वाटचाल करण्यासाठी माझ्या पावलांना मार्गदर्शन कर.
हे बृहस्पती, या सर्व गोष्टींमध्ये सुमेळ निर्माण कर.
(पण) हे कालीमाते, मला तू या देवदेवतांच्या अधीन होऊ देऊ नकोस.

– श्रीअरविंद (CWSA 12 : 429)

**

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society, Pondicherry Branch
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

## महाकालीचे नृत्य

ही कहाणी आहे साधिका शोभा मित्रा यांच्या जीवनातील. श्रीअरविंदाश्रमाच्या शाळेच्या वर्धापनदिनी होणाऱ्या कार्यक्रमात त्या वर्षी महिषासुरमर्दिनीवर नृत्य-नाटिका बसविण्यात आली होती. त्यामध्ये महाकालीची भूमिका शोभा मित्रा यांनी करावी असे श्रीमाताजींनी सांगितले होते. नृत्यनिपुण असणाऱ्या शोभा मित्रा त्यासाठी रोज सराव करत होत्या. पण साक्षात महाकालीसमोर, श्रीमाताजींसमोर नृत्य-नाटिकेत महाकाली कशी साकारायची असा त्यांना प्रश्न पडला होता. आपली अडचण त्यांनी श्रीमाताजींच्या कानावर घातली. तेव्हा श्रीमाताजींनी त्यांना सांगितले की, ''महाकालीला आवाहन करा.''

प्रयोगाचा दिवस उजाडला. नृत्य-नाटिका सुरू झाली आणि शोभा यांनी रंगमंचावर प्रवेश केला. शोभा अत्यंत उत्साहाने आणि ऊर्जेनिशी महाकालीची भूमिका वठवत होत्या. शुंभनिशुंभ या असुरांचा वध करण्याची भूमिका त्यांना करायची होती. अचानक त्यांच्या अंगात एक अननुभूत ऊर्जा संचारली आणि अल्पावधीतच महिषासुरमर्दिनीने त्या असुरांवर विजय मिळविला.

नृत्य संपले तरीही शोभा मित्रा यांचे शरीर महाकालीच्या आवेगाने थरथरत होते. पडदा पडल्यावर त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना श्रीमाताजींकडे नेले. श्रीमाताजींनी शोभा मित्रा यांचे दोन्ही हात हातात घेतले आणि त्या एकाग्र होऊन शोभा यांच्याकडे पाहू लागल्या. परिणामी, काही क्षणात शोभा पूर्वपदावर आल्या. श्रीमाताजी त्यांना म्हणाल्या, ''तुम्ही तुमच्या शरीरामध्ये आज महाकालीची उपस्थिती उतरविली होती. फारच छान!''

आज एका दिवसात शोभा यांना महाकालीचे आणि महेश्वरीचे दर्शन झाले होते.

- (शोभा मित्रा लिखित पुस्तकामधून...)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमश:)

### ०१ जानेवारी २००८

गतकाळाकडे पाहात बसू नका, तर तुम्ही जे काही करू इच्छिता त्याकडे, म्हणजे नेहमी पुढेच (तुमच्या ध्येयाकडे) दृष्टी ठेवा. तुम्ही असे केलेत तर निश्चितपणे तुमची प्रगती होईल.

– श्रीमाताजी (CWM 15 : 76)

*

### २१ फेब्रुवारी २००८

तुम्हाला तुमची चेतना जागृत ठेवायची असेल तर तुम्ही ध्यानासाठी एक ठरावीक वेळ राखून ठेवली पाहिजे आणि श्रीमाताजींचे स्मरण करून, आमच्या संपर्कात राहिले पाहिजे.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 312)

*

### २९ फेब्रुवारी २००८

यापुढे २९ फेब्रुवारी हा दिवस 'ईश्वराचा दिवस' म्हणून साजरा करण्यात येईल.

– श्रीमाताजी (CWM 15 : 99)

*

हे ईश्वरा, तू संकल्प केला आहेस
आणि मी तो प्रत्यक्षात आणला आहे.
एक नूतन प्रकाश या पृथ्वीवर प्रस्फुटित झाला आहे.
एक नूतन जगत उदयाला आले आहे.
ज्या गोष्टींचे अभिवचन देण्यात आले होते
त्यांची परिपूर्ती झाली आहे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 95)

*